1

" हुकुमनामा "

RCS No.706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 14130

~~दाव्याची हुकुमनामा पत्र~~

**मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर,अंबाजोगाई यांचे न्यायालयात**

रे.दि.दावा नं. 706/२०२५.

**वादी** :- महादेव पिता श्रीराम कदम वय ५५ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी** :- १) सदाशिव पिता श्रीराम कदम वय ४९ वर्ष धंदा शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

२) ज्ञानोबा पिता श्रीराम कदम वय ४७ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

३) हनुमंत पिता श्रीरामकदम वय ४१ वर्ष धंदा नौकरी, रा.सदर.

४) संगीता भ्र.तुकाराम कदम वय ३७ वर्ष धंदा व रा.सदर.

५) शंभुराजे पिता तुकाराम कदम वय १५ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

६) शुभ्रा पितातुकाराम कदम वय १२ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

दावा दाखल दिनांक - 13/11/2025
दावा निकाल दिनांक - 14/03/2026

**दावा** :- सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत.

**वादी आपले वादपत्र खालील प्रमाणे सादर करीत आहेत.**

१) हे की, वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे मौजे

पान नं.२ वर ....

RCS No. 70/2025
महादेव वि. सदाशिव
दि. 14/3/



चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहीवाशी असुन वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ आपसात सख्खे भाऊ असुन प्रतिवादी क्र.४ ही वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा मयत भाऊ तुकाराम पिता श्रीराम कदम यांची पत्नी असुन प्रतिवादी क्र.५ व ६ ही प्रतिवादी क्र.४ ची मुले म्हणजेच वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चे पुतणे आहेत.

२) हे की, वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक आहेत. वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या शेत जमीनी मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रु.पैसे | कोणाचे नांवे |
|---|---|---|---|---|
| १) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| २) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ३) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| ४) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| ५) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ६) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| **एकुण : १.६८** | | | **५-३१** | |

वरिल मिळक्तीस प्रस्तुत दाव्यात यापुढे "वादग्रस्त मिळकत" म्हणुन संबोधण्यात येत आहे.

पान नं.३ वर ...

RCS No.706/2025
महादेव वि. सदाशिव
नि.24/35



३) हे की, वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे मध्ये आपसात यापुर्वी कधीही कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत. केवळ कुटूंबाच्या सोयी करीता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चा भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र.४ चे पती आणि प्रतिवादी क्र.५ व ६ चे वडील नामे तुकाराम पिता श्रीराम कदम या तिघांच्या नांवे समान करण्यात आल्या होत्या. पुढे तुकाराम पिता श्रीराम कदम हा मयत झाल्यानंतर वारसा अधारे तुकाराम पिता श्रीराम कदम यांचे नांवे असलेल्या मिळकतीस वारसा अधारे प्रतिवादी क्र.४ ते ६ च्या नांवे वारसाचा फेर घेण्यात आलेला आहे. वास्तविक पहाता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या नांवे असलेल्या वरिल वादग्रस्त मिळकती मध्ये यातील वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/५ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचा एकुण १/५ हिस्सा आहे. मात्र सदर वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक या नात्याने वरिल पुर्ण वादग्रस्त मिळकतीची वहिती करुन उपभोग घेत आलेले आहेत.

४) हे की, वागद्रस्त मिळकती मध्ये वादीचा कायदेशिर १/५ हिस्सा असतांना केवळ वादग्रस्त मिळकत ही त्याचे नांवे नसल्यामुळे वादीला शासनाच्या योजनांच्या लाभापासुन वंचीत रहावे लागत आहे, याकरीता वादीने दिनांक २५/१०/२०२५ रोजी यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील वादीच्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या स्वतंत्र ताब्यात देण्याची विनंती केली असता, प्रतिवादींनी त्यास स्पष्ट नकार दिला. करीता

पान नं.४ वर ....

RCS No-706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 14/35



वादीला प्रतिवादींच्या विरुध्द मा.न्यायालयात प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असुन दाव्याचा जवाब देण्याची जवाबदारी प्रतिवादींवर आहे. दावा हक्क प्राप्तीची तारीख २५/१०/२०२५ ईसवी ही आहे.

५) हे की, दाव्यातील वादग्रस्त मिळकती या मा.न्यायालयाचे कार्यक्षेत्रातील असल्याने प्रस्तुतचा दावा मा.न्यायालयास दाखल करुन घेवुन चालविण्याचा अधिकार आहे.

६) हे की, वादीचा दावा सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळण्या संबंधीचा असल्याने वादी मा.न्यायालयाचे आर्थिक अधिकार मर्यादे करीता दाव्याचे मुल्य वादग्रस्त मिळकतीचा एकुण शेतसारा ५ रुपये ३१ पैसे चे २०० पट म्हणजेच ५.३१X२००=१,०६२/- रुपये करत असुन कोर्ट फिस करीता शेतसाऱ्याच्या ८० पट म्हणजेच ०५.३१X८०=४४५/- रुपये होतात, त्यावर वादी ठराविक कोर्ट फिस रक्कम रुपये २००/- देत आहे, जी की योग्य व पुरेशी आहे.

## <u>तरी विनंती की,</u>

वादीचा दावा प्रतिवादींच्या विरुध्द खालील प्रमाणे डिक्री करण्यात यावा.

अ) मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील दाव्याचे परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविलेल्या वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील वादीच्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते वादीच्या ताब्यात स्वतंत्र मालक म्हणुन देण्यात यावे.

ब) वादीस प्रतिवादींकडुन प्रस्तुत दाव्याचा खर्च देवविण्यात यावा.

पान नं.५ वर ....

R CS NO. 706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 14135



क) वादी अन्य ज्या मागणीचा कायद्यान्वये हक्कदार ठरतो ती वादीच्या हक्कात मंजूर केली जावी.

दिनांक:११ /११/२०२५. **वादी,**

महादेव पिता श्रीराम कदम,
रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुतच्या दाव्यातील परिच्छेद क्र.१ ते ४ मधील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर असुन कलम नं.५ व ६ मधील मजकुर कायदेविषयक असल्याने तो वकील साहेबांच्या सल्यानुसार खरा व बरोबर आहे, करीता यावर मी आज माझ्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्या खऱ्या आहेत.फ.

दिनांक:११ /११/२०२५. **वादी,**

महादेव पिता श्रीराम कदम,
रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

मार्फतः

**ॲड.पी.जी.शिंदे,**
**अंबाजोगाई**

RCS No. 706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 24/3/25

# मे.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) अंबाजोगाई यांचे न्यायालयात.

रे.दि.दा.नं.706/2025

महादेव कदम

**विरुध्द**

सदाशिव कदम व इतर

दावा :- सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत

## समजपत्र

वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये खालील प्रमाणे समेटपत्र दाखल करण्यात येत आहे.

1) **हे की**, वादी व प्रतिवादी क्र.1 ते 6 हे मौजे चनई, ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असून वादी व प्रतिवादी क्र.1 ते 3 हे आपसात सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र.4 ही वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 3 यांचा मयत भाऊ तुकाराम पिता श्रीराम कदम यांची पत्नी असून प्रतिवादी क्र.5 व 6 ही प्रतिवादी क्र.4 ची मुले म्हणजेच वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 3 चे पुतणे आहेत. हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

2) **हे की**, वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 6 हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक आहेत. वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या शेत जमिनी मौजे चनई, ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील शिवारात आहेत. परंतु या जमिनीच्या वाटण्या अद्याप पावेतो झालेल्या नाहीत. त्या जमिनीचा तपशील खालील प्रमाणे.

Reg No. 7061/2025
महादेव वि. सदाशिव
नि-14135

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्रफळ हे.आर | आकार रु. पै. | कोणाचे नावे |
|---|---|---|---|---|
| 1 | 114 | 0.14 | 0 - 46 | प्रतिवादी क्र.1 चे नावे |
| 2 | 114 | 0.14 | 0 - 46 | प्रतिवादी क्र.3 चे नावे |
| 3 | 114 | 0.14 | 0 - 46 | प्रतिवादी क्र.4 ते 6 चे नावे |
| 4 | 160 | 0.42 | 1 - 31 | प्रतिवादी क्र.1 चे नावे |
| 5 | 160 | 0.42 | 1 - 31 | प्रतिवादी क्र. 3 चे नावे |
| 6 | 160 | 0.42 | 1 - 31 | प्रतिवादी क्र.4 ते 6 चे नावे |
| | **एकुण** | **1.68** | **5 - 31** | |

वरील प्रमाणे जमिनी असुन सदर जमीनीत वादी यांचा कायदेशीर हिस्सा असुन त्या जमिन मिळकतीच्या अद्याप वाटण्या झालेल्या नाहीत.

हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

3) हे की, वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 6 यांचेमध्ये आपसात यापुर्वी कधीही कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत. केवळ कुटूंबाच्या सोयी करीता प्रतिवादी क्र.1 व 3 आणि वादी व प्रतिवादी क्र.1 ते 3 चा भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र.4 चे पती आणि प्रतिवादी क्र.5 व 6 चे वडील नामे तुकाराम पिता श्रीराम कदम या तिघांच्या नावे समान करण्यात आल्या होत्या. पुढे तुकाराम पिता श्रीराम कदम हा मयत झाल्यानंतर वारसा

Res No. 706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 14/35

आधारे तुकाराम पिता श्रीराम कदम यांचे नावे असलेल्या मिळकतीस वारसा आधारे प्रतिवादी क्र.4 ते 6 च्या नावे वारसाचा फेर घेण्यात आलेला आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र. 1 व 3 आणि प्रतिवादी क्र.4 ते 6 यांच्या नावे असलेल्या वरील वादग्रस्त मिळकतीमध्ये यातील वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 3 यांचा प्रत्येकी 1/5 आणि प्रतिवादी क्र.4 ते 6 यांचा एकुण 1/5 हिस्सा आहे. मात्र सदर वादग्रस्त मिळकतीची वादी आणि प्रतिवादी क्र.1 ते 6 हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक या नात्याने वरील पुर्ण वादग्रस्त मिळकतीची वहिती करून उपभोग घेत आलेले आहेत. हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

**वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये पुढीलप्रमाणे तडजोड झालेली आहे.**

1) **वादी महादेव पिता श्रीराम कदम यांच्या हिस्सास**

मौजे चनई येथील जमिन **गट क्र. 114** मधील 0.8.4 आर व गट क्र.160 मध्ये 0.25.2 आर जमीन वाटून आली आहे.

2) **प्रतिवादी क्र.1 सदाशिव पिता श्रीराम कदम यांच्या हिस्सास**

मौजे चनई येथील जमिन **गट क्र. 114** मधील 0.8.4 आर व गट क्र.160 मध्ये 0.25.2 आर जमीन वाटून आली आहे.

3) **प्रतिवादी क्र. 2 ज्ञानोबा पिता श्रीराम कदम यांच्या हिस्यास**

मौजे चनई येथील जमिन **गट क्र. 114** मधील 0.8.4 आर व गट क्र.160 मध्ये 0.25.2 आर जमीन वाटून आली आहे.

RCS No. 706/2025
महादेव वि. सदाशिव
नि. 14/35

**4) प्रतिवादी क्र. 3 हनुमंत पिता श्रीराम कदम यांच्या हिस्यास**

मौजे चनई येथील जमिन **गट क्र. 114** मधील 0.8.4 आर व गट क्र.160 मध्ये 0.25.2 आर जमीन वाटून आली आहे.

**5) प्रतिवादी क्र. 4 संगिता भ्र.तुकाराम कदम, प्रतिवादी क्र.5 शंभुराजे पिता तुकाराम कदम व प्रतिवादी क्र.6 शुभ्रा पिता तुकाराम कदम यांच्या हिस्सास**

मौजे चनई येथील जमिन **गट क्र. 114** मधील 0.8.4 आर व गट क्र.160 मध्ये 0.25.2 आर जमीन वाटून आली आहे.

4) **हे की**, वादी व प्रतिवादी यांनी या समजपत्राधारे जशा जमिनी वाटून घेतल्या आहेत तशाच कायमस्वरुपी करतील. तसेच वादी व प्रतिवादी यांनी प्रत्येकाचा स्वतंत्र ताबा ही करुन घेतला आहे हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

5) **हे की**, उपरोक्त जमिनीचे आपआपल्या वाटणी नुसार वादी व प्रतिवादी यांच्या नावे महसूल अभिलेखात नाव नोंदणी कामी सर्व वादी व प्रतिवादी ची संमती आहे. तसेच आज **दिनांक** 14/03/2026 पासुन उपरोक्त जमिनी वाटण्यानुसार वादी व प्रतिवादी यांच्या स्वतंत्र कब्जे वहिवाटीत दिलेल्या असून या पुढे सर्व वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

6) **हे की**, दाव्याचा खर्च आपआपला वादी व प्रतिवादी सहन करतील हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

करीता वादीचा दावा समेटपत्राच्या अधारे डिक्री करणे योग्य व न्यायाचे आहे.

RCS No. 706/2026
महादेव वि. सदाशिव
नि. 14/3/26

## तरी विनंती की,

मे. साहेबांनी वादीचा दावा समेटपत्रा अधारे निकाली काढण्याची कृपा करावी.

**दिनांक** :- 14 /03/2026

**वादी**

**महादेव पि.श्रीराम कदम**

**प्रतिवादी**

1) **सदाशिव पि.श्रीराम कदम**

2) **ज्ञानोबा पि.श्रीराम कदम**

3) **हनुमंत पि.श्रीराम कदम**

4) **संगिता भ्र.तुकाराम कदम**

**स्वत:करीता व अज्ञान प्रतिवादी क्र.5 व 6 करीता**

मार्फत,

ॲड.पी.जी.शिंदे

अंबाजोगाई.

मार्फत,

ॲड. जे.जी.पवार

अंबाजोगाई.

// ११ //

**R.C.S No.706/2025**
**Exh.14/ A**

हा वाद आज दिनांक १४/०३/२०२६ रोजी आयोजीत लोक अदालतमध्ये मा. श्रीमती प्रियंका ज. लिगाडे, पॅनल प्रमुख तथा २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबाजोगाई यांचे समोर वादी तर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. शिंदे व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. जे. जी. पवार यांचे समक्ष दावा काढुन घेण्याच्या पुरसिस वरून निकाली निघाल्यामुळे खालील आदेश होत आहे.

# ORDER

**14-03-2026**

| | |
|---|---|
| 1 | The Suit is disposed off in view of compromise pursis (Exh.11) and compromise memo at (Exh.13). |
| 2 | Compromise Decree be drawn in terms of pursis at Exh 11 and compromise memo( Exh.13) be formed as part and parcel of decree. |
| 3 | Court fees be refunded as per rules. |
| 4 | Copy of this order along with a memorandum describing property be sent to the concern regitering officer as per Section 89-A of the Registration Act, 1908. |

Date :- 14-03-2026.
Plce :- Ambajogai.

Sd/-14.03.2026
( **Priyanka J. Ligade**)
Panel Head
2nd Jt. Civil Judge Junior Division,Ambajogai.

//13//

R.C.S No.706/2025
Exh. 14/ A

याने दाव्याच्या खर्चाबदल रक्कम रुपये आज तारखेपासून उग्रातीच्या तारखेपर्यंत त्यावर दरसाल दर शेकडा या दराने होणा–या व्याजासह याजला दयावे.

## खर्चाचा आकडा

| | वादीला आलेला | रुपये | पैसे | | प्रतिवादीला आलेला | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | फिर्यादी अर्जास स्टॅप | २०० | ०० | १. | वजावाटीला किंवा विरुध्द दाव्यास स्टॅप | ००० | ०० |
| २. | वकीलपत्रास मुद्रांक नि. २ ... | १० | ०० | २. | वकीलपत्रास मुद्रांक नि. ०६ | १० | ०० |
| ३. | दाखल झालेल्या कागदास स्टॅप एकूण पुढील बाजूवर दिलेली | ०० | ०० | ३. | दाखल झालेल्या कागदास स्टॅप एकुण पुढील बाजूवर दिलेली | ०५ | ०० |
| ४. | साक्षीदारास निर्वाह भत्ता .... | | | ४. | साक्षीदारास निर्वाह भत्ता | | |
| ५. | रु. /–वरील प्लीडर फी | १५० | ०० | ५. | प्लीडराची फी ... विरुध्द दाव्यावरील फी | १५० | ०० |
| ६. | प्रोसेसी लागू करणे .... | ०० | ०० | ६. | प्रोसेसी लागू करणे | | |
| ७. | कमिशनरची फी ... .... | | ०० | ७. | कमिशनरची फी | | |
| ८. | भाषातंराची फी ... ... | | ०० | ८. | भाषातराची फी | | |
| ९. | नकला करण्याची फी ... | | ०० | ९. | नकला करण्याची फी | | |
| १०. | तहकूबीबदल दिलेला ... | | ०० | १०. | तहकूबीबदल दिलेला | | |
| ११. | वारस दाखल करण्याबददलच्या अर्जावरील स्टॅप | | ०० | | | ० | |
| | एकूण :— | ३६० | ०० | | एकूण :— | १६५ | ०० |
| | न दिलेला खर्च | | | | न दिलेला खर्च | | |
| | फिर्यादी अर्जावरील | ०० | | | विरुध्द दाव्यावरील | | |
| | लीडराच्या फीवरील | | | | प्लीडराची फीवरील | | |
| | प्रोसेसीवरील | | | | प्रोसेसीवरील | | |
| | दाखल झालेल्या कागदांवरील ;पुढील बाजूवर पहाव्ह | | | | दाखल झालेल्या कागदावरील ;पुढील बाजूवर पहाव्ह | | |
| | एकूण :— | ३६० | ०० | | एकूण :— | १६५ | ०० |

आज तारीख १४ माहे ०३ सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिला

कारकून 23/3/26

वादीतर्फे वकील

Adv. P. G Shinde

प्रतिवादीतर्फे वकील

gade 23.03.2026

**( प्रियंका ज. लिगाडे )**
**पॅनल प्रमुख,**
२रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अंबाजोगाई

{ हैया मुकदम्यातील पक्षकारांना असी ताकीद देण्यात येते की त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते (परत) नेले नसतील तर अपील चालू असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र होतील }

// १५ //

R.C.S No.706/2025
Exh. 14/ A

| वादीकडून | रुपये | पैसे | |
|---|---|---|---|
| दिलेला खर्च<br>दाखल झालेला कागद नंबर नि. | | | |
| न दिलेला खर्च<br>दाखल झालेले कागद नंबर | | | |
| नि. ० | ०० | | |
| एकुण | ०० | | |

| एकतर्फा | रुपये | पैसे | |
|---|---|---|---|
| दिलेला खर्च<br>दाखल झालेला कागद नंबर नि. | | | |
| न दिलेला खर्च<br>दाखल झालेले कागद नंबर | | | |
| नि. ०९ | ०५ | | |
| एकुण | ०५ | | |